# पोलीस अधीक्षक
## सोलापूर ग्रामीण यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र. 0217-2732001 ई मेल-sp.solapur.r@mahapolice.gov.in

दिनांक- 17/01/2024

## प्रेसनोट

### मा. पंतप्रधान भारत सरकार यांचे सभेसाठी येणारे नागरिकांना सूचना

---

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, भारत सरकार यांचा दिनांक 19/01/2024 रोजी सोलापूर ग्रामीण जिल्हा दौरा कार्यक्रम आहे. रे नगर मौजे कुंभारी ता. दक्षिण सोलापूर येथील पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत 15 हजार घरकुलांचे लाभार्थ्यांना वितरण सार्वजनिक समारंभाद्वारे करण्यात येणार आहे. यानिमित्ताने सार्वजनिक सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मा. पंतप्रधान महोदयांच्या सभेच्या सुरक्षेच्या अनुषंगाने सभेस येणा-या सर्व नागरिकांची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. तपासणीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सभेस येणा-या नागरिकांच्या प्रवेशास सकाळी 07-30 वाजेपासून सुरुवात करण्यात येणार आहे. सभेस येणा-या नागरिकांना त्यामुळे सकाळी 07-30 वाजेपासुन येण्याबाबत जिल्हा पोलीस प्रशासतर्फे आवाहन करण्यात येत आहे. जेणेकरून नागरिकांची सुरक्षा तपासणी वेळेमध्ये पूर्ण होवू शकेल. मा.पंतप्रधान महोदयांचे आगमनापुर्वी कमित कमी एक तास अगोदर सर्व नागरिकांनी स्थानापन्न होणे आवश्यक आहे.

सभेस येणारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी सभेस येताना मोठया बॅग, झेंडे, बॅनर, राजकीय पक्षाचे बॅनर, घोषवाक्य फलक, पाण्याच्या बॉटल, खादयपदार्थ, ज्वालाग्रही पदार्थ, जसे लायटर, काडीपेटी इत्यादी, तसेच बिडी, सिगारेट, तंबाखू, गुटखा असे पदार्थ सोबत आणू नयेत. सभेसाठी दिलेल्या वेळेत सभास्थळी यावे व वर उल्लेख केलेले निषिध्द पदार्थ आणू नयेत. तपासणी निर्धारित वेळेत व घाई गडबड न करता पूर्ण करता यावी यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनास नागरिकांनी सर्वोतोपरी सहकार्य करावे असे आवाहन पोलीस अधीक्षक, शिरीष सरदेशपांडे यांनी केले आहे.

( शिरीष सरदेशपांडे )
पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण.

**प्रति,**

मा.संपादक ,
आपले वर्तमान पत्रात सदरची बातमी प्रसिध्द करणेस विनंती आहे.
सर्व दृकश्राव्य माध्यम,केबल नेटवर्क,ऑनलाईन मिडीया.